# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १६७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. इंडियन रेडक्रॉस सोसायटी,<br>उप शाखा पंढरपूर, संचलित सौं. सरजुबाई बजाज ब्लड बँक,<br>६२/२/३/४ भक्ती मार्ग, पंढरपूर , जि. सोलापूर ४१३ ३०४ | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, सोोलापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, पंढरपूर, जि.सोलापूर<br>३) उप कार्यकारी अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>शहर उप विभागीय कार्यालय, स्टेशन रोड, पंढरपूर, जि. सोलापूर | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

इंडियन रेडक्रॉस सोसायटी उप शाखा पंढरपूर संचलित सौं. सरजूबाई बजाज ब्लड बँक, पंढरपूर या रक्तपेढीस अखंडित विद्युत पुरवठा होण्यासाठी दि. ३०.३.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर येथे ' क्ष ' फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीची सुनावणी दि. ४.५.२०१० रोजी होऊन सोलापूर कक्षाने दि. ११.५.२०१० रोजी निर्णय दिला आहे. तो निर्णय मान्य नसल्यामुळे तक्रारदार यांनी कोल्हापूर मंचाकडे दि. २८.७.२०१० रोजी ' अ ' फॉर्ममध्ये अपील दाखल केले.

सदर अपीलाची सुनावणी दि. ३.९.२०१० रोजी महावितरण विभागीय कार्यालय पंढरपूर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदारातर्फे डॉ. श्री. अशोक दोशी, डॉ. श्री. सदानंद पाटील व श्री. व्ही. आर. देशपांडे हजर होते. वि.प.तर्फे श्री. प्रसाद, नोडल ऑफीसर, सोलापूर, श्री. करमुडे, कार्यकारी अभियंता, पंढरपूर श्री. बिट्रा उप कार्यकारी अभियंता पंढरपूर शहर उप विभाग हे हजर होते.

तक्रारदाराने खालील प्रमाणे म्हणणे मांडले.

आमची संस्था गेल्या २२ वर्षांपासून कार्यरत असू गरजू रुग्णांना ना नफा ना तोटा या तत्वावर रक्त पुरवठा करुन जीवनदानाचे काम करीत आहे. रक्ताच्या पिशव्यासाठी ४ ते ६ अंश सेंटीग्रेड तापमान राखावे लागते. संस्थेला योग्य दर्जाचे रक्त ठेवण्याकरीता अखंडीतपणे वीज पुरवठ्याची गरज आहे.

अखंडीत वीज पुरवठा व्हावा म्हणून संस्थेने अर्ज करुन रु. २४७७५/– दि. १४.८.२००६ रोजी भरुन वितरण कंपनीच्या अटीप्रमाणे ट्रान्सफॉर्मर, पोल, वायर व लेबर चार्जेस रु. २,७०,०००/– खर्च केलेला आहे. त्याप्रमाणे सन २००७ साली रक्तपेढीस अखंडीत विद्युत पुरवठा सुरु झाला.

परंतु डिसेंबर २००८ पासून कोणतीही पूर्व सूचना न देता भारनियमन करुन विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येऊ लागला. त्यामुळे वारंवार रक्ताच्या पिशव्या खराब होऊन रक्त वाया गेले व रुग्णांची गैरसोय झाली. त्यामुळे संस्थेस जनरेटर बसविण्यासाठी जादा रु. ३ लाख खर्च करावे लागले व दैंनंदिन रु. ७००/– खर्च करावे लागत आहे.

ऊर्जा मंत्री, कार्यकारी संचालक महावितरण पुणे व स्थानिक कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करुनसुध्दा विद्युत पुरवठा अखंडितपणे करण्यात आलेला नाही. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी खालील प्रमाणे मागणी केली.

१) रक्तपेढीस अखंडीत विद्युत पुरवठा करण्याची कार्यवाही व्हावी.

२) संस्थेस झालेल्या संपूर्ण खर्चाची भरपाई वितरण कंपनीकडून व्हावी.

वितरण कंपनीतर्फे श्री. करमुडे, कार्यकारी अभियंता, पंढरपूर यांनी खालील प्रमाणे म्हणणे मांडले.

सदर कनेक्शन हे व्यावसायिक कारणासाठी दिलेले असून त्याचा १२ किलोवॅट लोड आहे. कनेक्शन देतेवेळी सदर ग्राहक हा ११ के.व्ही. गणेशनगर फीडरवर जोडला होता. त्यानंतर ग्राहकाच्या मागणीनुसार ११ के.व्ही. वॉटर वर्क्स फीडरवर स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसवून विद्युत पुरवठा जानेवारी २००७ पासून करण्यात आला. ग्राहकाने १५% सुपरव्हिजन चार्जेस रु. २४७७५/– भरुन ट्रान्सफॉर्मर व लाईनचे काम करुन घेतले व ते कंपनीस हस्तांतरीत केले आहे. त्यामुळे त्यांचे मागणीनुसार वॉटर वर्क्स फीडरवर कनेक्शन जानेवारी २००७ ला चालू झाले व तो आजही वॉटर वर्क्स फीडरवर चालू आहे.

त्यानंतर सदर वॉटर वर्क्स फीडरवर डिसेंबर २००८ पासून लोड शेडींग महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या प्रोटोकॉल प्रमाणे चालू करण्यात आले. त्यामुळे सध्या ग्राहकास अखंडीत वीज पुरवठा मिळू शकत नाही. त्यात कंपनीचा दोष नाही. ग्राहकाने मागणीनुसार विद्युत पुरवठा वॉटर वर्क्स फीडरवर जोडण्यासाठी खर्च केलेला आहे, तो त्यांच्या संमत्तीनुसार झालेला आहे, त्यास कंपनी जबाबदार नाही. मा. संचालक ( संचालन ) महावितरण मुंबई यांचे पत्र क्र. ३७७७० दि. २.८.२००८ व मुख्य अभियंता (वितरण) मुंबई यांचे पत्र क्र. १७९२१ दि. १६.४.२००८ नुसार एक्सप्रेस फीडरवर एल. टी. ग्राहक जोडता येत नाही व सदर ग्राहक हा एल.टी. ग्राहक आहे. त्यामुळे २४ तास विद्युत पुरवठा एक्सप्रेस फिडरद्वारे करता येणे शक्य नाही.

दि. १६.४.२००८ च्या परिपत्रकानुसार उपकेंद्रातून स्वतंत्र एक्सप्रेस फीडरचा संपूर्ण खर्च ग्राहक करीत असल्यास Dedicated Distribution Facility सदराखाली विद्युत पुरवठा करता येईल.

दि. ३.९.२०१० च्या सुनावणीच्या वेळेस तक्रारदाराने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग सोलापूर यांनी कासेगांव पाणी पुरवठा एक्सप्रेस फीडरवरुन रक्तपेढीस वीज जोडणी करुन घेण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिले असल्याचे सांगितले. परंतु वितरण कंपनीचे म्हणणे असे आहे की सदर कासेगांव एक्सप्रेस फीडर सध्या ३३/११ के.व्ही. पंढरपूर शहर उपकेंद्रातून चालू असून त्या फीडरची लांबी जास्त असल्यामुळे विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होतो व तसेच कमी दाबाने होत आहे. त्यामुळे सदर फीडर कायमस्वरुपी नवीन होणाऱ्या पंढरपूर लिंक रोड उपकेंद्रातून २ महिन्यात कार्यान्वित होणार आहे. त्यामुळे कासेगांव पाणी पुरवठा फीडरवर सदर रक्तपेढीचे कनेक्शन जोडता येणे शक्य नाही. रक्तपेढीही पंढरपूर शहर उपकेंद्रापासून जवळ आहे व नवीन लिंक रोड उपकेंद्र हे बरेच लांब आहे.

सुनावणीच्या वेळेस रक्तपेढीची अत्यावश्यक सेवा लक्षात घेता वितरण कंपनीने अखंडित विज पुरवठा देण्यासाठी आहे त्या परिस्थितीत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठवावा व त्यावर ग्राहकाने पाठपुरावा करावा असे ठरले. त्यानुसार वितरण कंपनी पंढरपूर यांनी दि. ६.१०.२०१० रोजी प्रस्ताव सोलापूर कार्यालयाकडे पाठविलेला आहे. दि. २६.११.२०१० रोजी श्री. प्रसाद, कार्यकारी अभियंता, सर्कल ऑफीस, सोलापूर यांचेशी भ्रमणध्वनीवरुन चर्चा केली असतां, सदर प्रस्तावावर निर्णय घेऊन ग्राहकास कळविण्यात येत आहे.

वरील विवेचनानुसार खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

प्रश्न १ : वितरण कंपनी पंढरपूर यांना रक्तपेढीस अखंडित पुरवठा करणे शक्य आहे का ?

उत्तर : नाही

प्रश्न २ : तक्रारदाराने सन २००६ साली ट्रान्सफॉर्मर, लाईनसाठी केलेला संपूर्ण खर्च वितरण कंपनीने भरपाई म्हणून द्यावी का ?

उत्तर : नाही

<u>कारणमिमांसा</u>

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या प्रिन्सिपल व प्रोटोकॉल प्रमाणे राज्याच्या विविध भागामध्ये भार नियमन करणे बंधनकारक आहे, त्यामुळे कंपनी स्थानिक पातळीवर भार नियमन रद्द करु शकत नाही. आयोगाच्या धोरणाविरुध्द भार नियमना बाबत कंपनीस आदेश देणे मंचास संयुक्तिक वाटत नाही.
तसेच ग्राहकाने स्वत:हून अखंडित विद्युत पुरवठा मिळण्यासाठी ट्रान्सफॉर्मर व लाईनसाठी सदर खर्च केलेला आहे. स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर असल्यामुळे इतर ग्राहक त्यावर जोडलेले नाहीत. सकृतदर्शनी खर्चाची भरपाई द्यावी असे मंचास वाटले तरी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशाप्रमाणे नवीन कनेक्शनसाठी ८ सप्टेंबर २००६ पासून शेड्यूल ऑफ चार्जेस लागू आहेत. सदर ग्राहकाने केलेला खर्च पूर्वीच अस्तित्वात असलेल्या कनेक्शनसाठी स्वत:च्या सोयीसाठी केलेला आहे. म्हणून खर्चाची भरपाई देण्याबाबत आदेश देणे संयुक्तिक होणार नाही.

सुनावणी दरम्यान कंपनीस व ग्राहकास पाठपुरावा करण्यासाठी दिलेल्या कालावधीमुळे मंचास मुदतीत निर्णय देता आला नाही.

## आदेश

१) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांनी पारीत केलेला दि. १.५.२०१० रोजीचा आदेश कायम करीत आहोत.

२) अखंडित विद्युत पुरवठा देणेबाबत आदेश नाही.

३) ग्राहकाने केलेल्या खर्चाच्या भरपाईबाबत आदेश नाही.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.